# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोननं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेसनोट क्रमांक :- ११७-२३** **दिनांक :- ११/०४/२०२३**

## मार्च महिन्यामध्ये उत्कृष्ट कामगिरी करणा-या पोलीस अधिकारी / अंमलदार यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीत मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार.

**१)** फिर्यादी नामे सौ. सुनिता दिलीप गवळी, वय ४० वर्षे, व्यवसाय गृहीणी, रा, साईबाबा नगर,रुम नं.४७८, भुत बंगला, देवी पाडा, बोरीवली पुर्व यांनी खबर दिली कि, दिनांक १८/०३/२०२३ रोजी दुपारी ०३.३० वाजता ते २१.३० वाजेच्या दरम्यान मिरा रोड पुर्व भागातील एस.के.स्टोन चौकीच्या मागे असलेल्या मोकळया मैदानात कार्यक्रमाच्या ठिकाणावरुन फिर्यादी व इतर महिलांचे सुमारे ४५५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने किंमत अंदाजे ०४,५५,०००/- रुपयांची मालमत्ता अज्ञात ईसमांनी आपसात संगणमत करुन फिर्यादी व इतर साथीदार यांचे संमतीशिवाय जबरी चोरी करुन नेले.

सदर गुन्हयांचा समांतर तपास गुन्हे शाखा कक्ष १ हे करीत असताना गुन्हयांचे घटनास्थळावरुन प्राप्त माहितीच्या अनुषंगाने गुन्हयांतील आरोपीत नामे १) गीतादेवी सरदार सिंह, वय ४५ वर्षे, रा. आझादनगर, चिकसाणा पोलीस ठाणे, रुंध इकरण भरतपुर राज्य राजस्थान, २) सेतू रणबीर सिंग, वय २२ वर्षे, रा. आझादनगर, चिकसाणा पोलीस ठाणे, रुंध इकरण भरतपुर राज्य राजस्थान, ३) सोनिया अनिल कुमार, वय २२ वर्षे, रा. भक्तल चौक जिल्हा अलवर राजस्थान, ४) रेश्मा हिरा राम बावरिया, वय ५५ वर्षे, रा. बावरिया बस्ती जिल्हा झुनझुन राजस्थान ५) पिंकी सुर्यप्रताप सिंग ऊर्फ राहुल, वय ३० वर्षे, रा. खैरतल जिल्हा अलवर राजस्थान, मुळगाव मंका मुंडावर जिल्हा अलवर राजस्थान,६) हेमा ऊर्फ हिरो देवी सुरज, वय ३० वर्षे, रा. अलवर जिल्हा, राजस्थान, ७) अर्जुन सिंग विरेंद्र सिंग, वय ३५ वर्षे, रा. आझादनगर, चिकसाना पोलीस ठाणे भरतपुर राजस्थान, ८) रंजित कुमार ऊर्फ प्रविणकुमार लोधी, वय ३० वर्षे, रा. भोगाव, बिछवा, पोलीस ठाणे मैनपुरी, उत्तर प्रदेश यांना अटक करण्यात आले. सदर गुन्हयांच्या तपास गुन्हे शाखा कक्ष १ व मिरारोड पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार यांनी केला असुन ४१९ ग्रॅम वजानाचे सोन्याचे दागीने जप्त केले आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष १ चे पो.नि. श्री. अविराज कुराडे, स.पो.नि. कैलास टोकले, पुष्पराज सुर्वे, स.फौ. राजु तांबे, संदीप शिंदे, किशोर वाडीले, संजय पाटील, पो.हवा. अविनाश गर्जे, संजय शिंदे, संतोष लांडगे, पुष्पेंद्र थापा, सचिन सावंत, विजय गायकवाड, प्रफुल्ल पाटील, विकास राजपूत, समीर यादव, पो.अंम. प्रशांत विसपुते, सनी सुर्यवंशी सर्व नेमणुक गुन्हे शाखा कक्ष १ म.पो.हवा. सुप्रीया तिवले नेम. अ.मा.वा.शा. नालासोपारा, सवर्णा माळी, नेम, सायबर सेल, मिरारोड पोलीस ठाण्याचे व.पो.नि. विजयसिंह बागल, स.पो.नि. हनिफ शेख, सफौ. प्रशांत महाले, पो.हवा. बालाजी आरणे, अमितकुमार जाधव, राहुल गावडे, प्रदीप

गाडेकर, प्रफुल म्हाकुलकर यांचा दिनांक ११/०४/२०२३ रोजी मा. श्री. मधुकर पाण्डेय, पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांनी मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ मार्च महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल” क्रमांक -१** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. विजयसिंह बागल, पो.नि.श्री. अविराज कुराडे**

**२)** पिडीत मुलगी ही अल्पवयीन असल्याचे माहित असताना अज्ञात अरोपीने तिच्या मतीमंदतेचा फायदा घेवुन तिचे इच्छेविरुध्द जबरदस्तीने ६ महिन्यापुर्वी पासुन वारंवार शारिरीक संबंध ठेवुन तिस गरोदर केल्याने विरार पोलीस ठाणेत अज्ञात आरोपीताविरुध्द गुन्हा.रजि.नं. I २८३/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७६,३७६ (२) (एल) (एन) सह बालकाचे लैंगिक अपराधापासुन संरक्षण अधिनियम २०१२ चे कलम ४,५ (के),६,८,१० अन्वये दिनांक १७/०३/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर प्रकरणी कोणतीही माहिती पिडीत व तिच्या घरातील सदस्यांना नसताना सदर गुन्हयातील आरोपीतास संवाद कौशल्याचा वापर करुन निष्पन्न करुन अटक करण्यात आली.

सदरची कामगिरी करणारे श्री. राजेंद्र कांबळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, विरार पोलीस ठाणे, पो.नि. श्री. दिलीप राख, सपोनि रुपेश दळवी, म.पोउप.नि. धनश्री बाजगीरे, पो.अंम. सतिश बर्गे यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **“ मार्च महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट**

**उकल" क्रमांक -२** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. राजेंद्र कांबळे**

३) फिर्यादी नामे श्री. अकबरअली मोहम्मदअली चुडीहार, रा. रुम नं २०२, बि.नं ०६, डी.बी.ओझोन ठाकुर मॉलजवळ, काशिमीरा, मिरारोड पुर्व, ता. जि. ठाणे हे दिनांक २३/०३/२०२३ रोजी १२.०० वा. ते दिनांक २६/०३/२०२३ रोजी सायंकाळी १६.०० वा. चे दरम्यान रमजान उत्सवानिमित्त चंद्र दर्शनासाठी गोरेगाव, मुंबई येथे गेले असता त्यांचे राहते घराच्या खिडकीच्या ग्रीलचे दोन गज कापुन घरात प्रवेश करुन घरातील लाकडी तसेच लोखंडी कपाटातील ड्रॉव्हरमध्ये ठेवलेले एकुण २९३ ग्रॅम वजनाचे १४,६५,०००/- रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने, एक किलो वजनाचे ७०,०००/- रुपये किंमतीचे चांदीचे दागिने व ०९,००,०००/- रुपये रोख रक्कम असा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात इसमाने घरफोडी चोरी करुन नेल्याबाबत फिर्यादी यांनी तक्रार दिल्याने काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नं. २२५/२०२३ भा.द.वि.सं. कलम ४५४, ४५७ ३८०, अन्वये दिनांक २६/०३/२०२३ रोजी दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणण्याबाबत काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. संदीप कदम यांनी गुन्हे प्रकटीकरण पथकातील स.पो.नि. श्री. प्रशांत गांगुर्डे यांना आदेशित केले होते. नमुद गुन्हयातील आरोपीच्या गुन्हे कार्यपध्दतीवरुन अश्याप्रकारचे गुन्हे करणारे ईसमांची माहिती घेतली असता गुप्तबातमीदारा मार्फत प्राप्त माहितीच्या आधारे आरोपीत नामे अब्दुल शेख ऊर्फ अब्दुल चिरा, वय ४६ वर्ष, रा. रुम नं २११, आदर्श निवास, अलकापुरी, आचोळा क्रॉसरोड, नालासोपारा, ता.वसई, जिल्हा- पालघर याने सदरचा गुन्हा केला असल्याचे व तो परराज्यात पळुन जाण्याच्या तयारी असल्याचे समजल्याने स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे व पथकाने नालासोपारा रेल्वे स्टेशन परिसरात सापळा रचुन वर नमुद आरोपीतास ताब्यात घेतले. सदर अटक आरोपीताकडुन गुन्हयातील चोरी केलेल्या रक्कमेपैकी ०७,७५,७००/- रोख रुपये हे जागीच हस्तगत करण्यात आले आहेत. तसेच तपासादरम्यान चोरीस

गेलेले २९३ ग्रॅम वजनाचे १४,६५,०००/-रुपये किंमतीचे सोन्याचे दागिने व ८५० ग्रॅम वजनाचे ७०,०००/- रुपये किंमतीचे चांदीचे दागिने असा एकुण २३,१०,०००/- रुपये किंमतीचा मुदेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.वर नमुद आरोपी हा अभिलेखावरील सराईत आरोपीत असुन त्याचेविरुध्द मुंबई, ठाणे, पालघर, अजमेर राज्य-राजस्थान या परिसरात घरफोडीचे १४ हुन अधिक गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी करणारे श्री. संदीप कदम, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, काशिमीरा पोलीस ठाणे, पो.नि. श्री. विजय पवार (गुन्हे), स.पो.नि. प्रशांत गांगुर्डे, पो.उप.नि. जावेद मुल्ला, प्रकाश कावरे, सागर साबळे, म.पो.उ.नि.अर्चना जाधव, स.फौ. अनिल पवार, पो.हवा.०६०३४ सचिन हुले, निलेश शिंदे, सुधीर खोत, राहुल सोनकांबळे, संतोष तायडे, रविंद्र कांबळे, पो.अंम. शरद नलावडे, प्रविण टोबरे तसेच पो.हवा. जयप्रकाश जाधव नेम. पोलीस उप आयुक्त कार्यालय, परिमंडळ१ यांचा मासिक गुन्हे आढावा बैठकीमध्ये **"मार्च महिन्यातील गुन्हयाची उत्कृष्ट उकल" क्रमांक - ३** म्हणुन प्रशस्तीपत्र व बक्षिस देवुन मा. पोलीस आयुक्त श्री. मधुकर पाण्डेय यांनी सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि श्री. संदीप कदम**

४) भरोसा सेल येथे महिला नामे श्रीमती परवीन शेख, वय ५० वर्षे रा. उत्तन, भाईंदर प यांनी केलेल्या तक्रारी अर्जामध्ये त्यांचा मुलगा शहजान खान, वय २५ वर्षे यास ठाणे येथील एजंटने थायलैंड येथे नोकरी मिळवून देतो अशी बतावणी करुन दिनांक ०४/११/२०२२ रोजी प्रथम चेन्नई एअरपोर्ट येथे पाठवून टुरिस्ट व्हिजाच्या माध्यमातून थायलैंड येथे पाठवले. तदनंतर थायलैंड येथून पुशिंगच्या माध्यमातून दिशाभूल करून म्यानमार येथे पाठवले. म्यानमार येथील एका कंपनीमध्ये त्याला कॉलींग करण्याचे काम दिले होते. दिलेले टारगेट पुर्ण झाले नाही तर अमानुष छळ केला जात व मोबाईल काढून घेण्यात आला होता. २८ दिवसानंतर शहजानला मोबाईल अर्ध्या तासाकरिता दिला गेला होता. त्यावेळी त्याने अर्जदार महिला परवीन यांना फोन करून त्याची फसवणूक झाली असून थायलैंड येथे नोकरी न देता पुशिंगच्या माध्यमातून त्याला म्यानमार येथे नेल्याचे सांगितले. शहजान याचेसोबत कोणताही संपर्क होत नसल्यामुळे तो नक्की कुठे आहे व कोणत्या परिस्थितीमध्ये आहे याबाबत तक्रारदार यांना काहीएक माहिती नव्हती. परदेशात कामानिमित्त गेलेले व अडकून पडलेल्या नागरिकांना भरोसा सेल, भाईंदर यांनी मदत केल्याचे

त्यांना माहित होते. त्यामुळे त्यांच्या मुलाला सुखरूप परत भारतात आणण्यासाठी त्यांनी भरोसा सेल येथे तक्रारी अर्ज दिला होता.

भरोसा सेल येथे परवीन खान यांनी दिलेल्या तक्रारी अर्जाची माहिती वरिष्ठांना देवुन त्यांचे मार्गदर्शन व सुचनेप्रमाणे भरोसा सेलच्या सपोनि श्रीमती तेजश्री शिंदे यांनी भारतीय दूतावास यांना संपर्क साधून त्यांचे मदतीने शहजान खान यास दिनांक ३०/०३/२०२३ रोजी सुखरूप भारत देशात आणण्यात आले.

सदरची कामगिरी करणारे श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे), स.पो.नि. श्रीमती तेजश्री शिंदे, पो.हवा. सचिन तांबवे, म.पो.अं. आफ्रिन जुन्नैदी यांचा **"मार्च महिन्यातील उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड"** देवुन मा. पोलीस आयुक्त यांनी सत्कार केला आहे.



**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना सपोनि.श्रीमती तेजश्री शिंदे**

**५**) दिनांक ०१.०३.२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. बांदल यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळली की , एक नायजेरीयन इसम अंमली पदार्थ विक्री करिता नालासोपारा पुर्व, प्रगतीनगर येथील जिवदानी हॉलचे बाजुला येणार आहे. सदरबाबत गुन्हे प्रकटीकरण पथकाचे अधिकारी व अंमलदार यांनी मिळालेल्या बातमीची शहानिशा करुन कारवाई करणेबाबत वरिष्ठांकडून आदेश प्राप्त केले.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कायदेशीर बाबींची पुर्तता करुन एक नायजेरीयन इसम प्रगतीनगर, नालासोपारा पुर्व येथील जिवदानी हॉलचे बाजुला आला असता तो पळुन जावु लागल्याने गुन्हे प्रकटीकरण पथकातील पथकामधील अधिकारी व अंमलदार यांनी त्याचा पाठलाग करुन त्यास पंचासमक्ष ताब्यात घेवून नाव व पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव व पत्ता इदे इम्यानुवेल इदे पॉल, वय २६ वर्षे, रा. प्रगतीनगर नालासोपारा (पुर्व) असल्याचे सांगितले. त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे १०,२४,०००/- रु. किंमतीचा १०२.४०० ग्रॅम वजनाचा एम.डी. अंमली पदार्थ मिळून आला. तसेच नमूद इसमाच्या राहत्या घराची घरझडती घेतली असता त्याच्या राहत्या घरात १७,२२,५००/- रु. किंमतीचा १७१.२५० ग्रॅम वजनाचा कोकेन अंमली पदार्थ, ३१,२८,३००/- रु. किंमतीचा २२३.४५ ग्रॅम वजनाचा ग्क़्न्ऋ/ क्क्च्च्ऋइ अंमली पदार्थ मिळून आल्याने तो जप्त करण्यात आला.

नमूद आरोपीताविरुध्द पो.उप.नि.बांदल यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरुन तुळींज पोलीस ठाणेत गु.रजि.नं. १८१/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २१ क, २२ क अन्वये दिनांक ०२.०३.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी करणारे तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, प्रकटीकरण शाखेचे सपोनि. मिथुन म्हात्रे, पोउनिरी. बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.हवा. अनिल शिंदे, आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, तडवी, पन्हाळकर, पांडुरंग केंद्रे, पो.अंम. छपरीबन, राऊत यांचा **"मार्च महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड १"** देवुन सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना वपोनि. श्री. शैलेंद्र नगरकर**

**६)** दिनांक १३/१२/२००७ रोजी सकाळी ०८.४५ वाजेच्या पुर्वी मुंबई-अहमदाबाद हायवे रोड क्रमांक ८ चे पुर्वेस, गुरुकृपा हॉटेलच्या समोर, कर्नाल पाडा गावाकडे जाणा-या रोडच्या बाजुला अज्ञात आरोपीत यांनी अज्ञात कारणावरुन एक अनोळखी पुरुष वय अंदाजे ३० ते ३५ वर्ष यास कोणत्यातरी हत्याराने जिवे ठार मारुन पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने प्रेत झाडी झुडपात टाकुन दिले म्हणुन फिर्यादी नामे मधुकर सनकर यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन माणिकपुर पोलीस ठाणेत गुन्हा रजि. नंबर ३८०/२००७ भा.द.वि.सं. कलम ३०२, २०१ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता व तपासादम्यान गुन्हयातील मयत इसम याची ओळख संजय विनोद झा, वय ३२ वर्षे, व्यावसाय प्रॉडक्शन मॅनेजर गारमेंट फॅक्टरी, रा. मिरारोड जि. ठाणे असे निष्पन्न झाले होते.

गुन्हे शाखा कक्ष ३, विरार पथ्कातील अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार व तांत्रिक विश्लेषणाव्दारे प्राप्त माहितीचे आधारे आरोपीत १) पुरणसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ पुरणसिंग कापुरसिंग परिहार, वय ४१ वर्षे २) मोहनसिंग प्रतापसिंग उन्योनी ऊर्फ मोहनसिंग कापुरसिंग परिहार, वय ३८ वर्षे, दोन्ही रा. जि. बागेश्वर, राज्य उत्तराखंड यांना दिनांक २०/०३/२०२३ रोजी जि. बागेश्वर, राज्य उत्तराखंड येथुन ताब्यात घेतले होते. नमुद आरोपीत यांचेकडे अधिक तपास केला असता नमुद आरोपीत यांनी त्याचे साथीदारांसोबत गुन्हयातील मयत

इसम नामे संजय विनोद झा याचेशी झालेल्या आर्थिक व्यवहाराच्या वादातुन हत्या करुन त्याचा मृतदेह मुंबई-अहमदाबाद हायवे, रोड क्रमांक ८, कर्नाल पाडा गावाकडे जाणा-या रोडच्या बाजुला झुडपात फेकुन दिल्याचे व वर नमुद आरोपीत हे मागील १६ वर्षापासुन उत्तर प्रदेश, हिमाचल प्रदेश येथे आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना अटक करुन पुढील कारवाई करीता माणिकपुर पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष ३, विरारचे पो.नि. श्री. प्रमोद बडाख, पो.उप.निरी. शिवाजी खाडे, उमेश भागवत, पो.हवा. अशोक पाटील, मुकेश तटकरे, शंकर शिंदे, सचिन घेरे, सागर बारवकर, मनोज सकपाळ, अश्विन पाटील, पो.अंम. राकेश पवार, सुमित जाधव, म.सु.ब. प्रविण वानखेडे, सागर सोनवणे, गणेश यादव तसेच स.फौ. संतोष चव्हाण नेम सायबर गुन्हे शाखा यांचा **"मार्च महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.२"** देवुन सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि. श्री. प्रमोद बडाख**

७) आचोळे पोलीस ठाणे येथे दाखल असलेला गुन्हा रजि.नं. १५/२०२३ भा.द.वि.सं.कलम ३७९ अन्वये या गुन्हयाच्या व इतर घटनास्थळी प्राप्त सी. सी. टी.व्ही. फुटेजमधील व्यक्तींची गुप्त बातमीदारकरवी माहिती प्राप्त करण्यात आली. त्यावरुन तुळींज पोलीस ठाणे हद्दितील मोरेगाव परिसरामधुन दोन संशयितांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे चौकशी केली असता त्यांनी विरार, वालीव, आचोळे, माणिकपुर, काशिमीरा, दहिसर, कासा पोलीस ठाणे हद्दितुन १२ मोटार सायकली चोरी केल्याचे निष्पन्न झाले. नमुद दोन इसमांकडे त्यांचे गुन्हे करण्याच्या कार्यपध्दतीबाबत विचारणा करता ते घटनास्थळावरुन मोटार सायकली ढकलुन काही अंतरावर निर्जन स्थळी घेवुन जावुन त्या ठिकाणी युटयुबव्दारे नमुद मोटर सायकली ही विना चावी चालु करणेबाबतचे व्हिडीओ पाहुन सुरु करीत असल्याचे सांगितले. तसेच त्यानंतर चोरलेल्या मोटार सायकली सोनगड, राज्य गुजरात या ठिकाणी विक्री करीत असल्याबाबतची माहिती दिल्याने गुन्हे शाखा कक्ष २, वसई यांचे पथक सोनगड राज्य गुजरात या ठिकाणी जावुन सदर गुन्हयातील ७ मोटर सायकली तसेच गुन्हयात आरोपीत यांना मदत करणारे त्यांचे दोन साथीदार यांना सोनगड राज्य गुजरात येथुन ताब्यात घेण्यात आले आहे. गुन्हयात अटक करण्यात आलेले आरोपीत १) आनंद कमलेश ओझा, २) धीरज जटाशंकर ओझा, ३) कौशिक देविदास मराठे, ४) विधीसंघर्ष बालक. यास बाल न्यायमंडळ भिवंडी

येथे हजर करण्यात आले आहे. सदर आरोपीतांकडुन दुचाकी चोरीचे १३ गुन्हे उघड करण्यात आले आहेत.

सदरची कामगिरी करणारे गुन्हे शाखा कक्ष २, वसईचे पो.नि. श्री. शाहुराज रणवरे, सपोनि सुहास कांबळे, स.फौ. रमेश भोसले, संजय नवले, पो.हवा. चंदन मोरे, सचिन पाटील, जगदीश गोवारी, रमेश आलदर, सुधीर नरळे, पो.ना. प्रशांत ठाकुर, पो.अंम. अमोल कोरे, सायबर शाखेचे स.फौ. संतोष चव्हाण यांचा **"मार्च महिन्यातील गुन्हयाची उकल म्हणुन स्पेशल रिवॉर्ड क्र.३"** देवुन सत्कार केला आहे.




**मा. पोलीस आयुक्त यांचे हस्ते सत्कार स्विकारताना पोनि. श्री. शाहुराज रणवरे**

**-------000--------**